# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**हिंगोली जिल्हा परिषदेंतर्गत विविध योजनांमधून अपहारित झालेल्या रक्कमेबाबत**

**(१) १७४६६ (१४-०८-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हा परिषदेंर्तत विविध योजनांमधून तब्बल एक कोटी रुपयांच्या अपहारित रक्कमेपैंकी केवळ २७ लाख रुपयांचीच रक्कम वसुल झाली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मार्च अखेरपर्यंत उर्वरित तब्बल ७३ लाख रुपयांची अपहारित रक्कम संबंधितांकडून वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

जिल्हा परिषद हिंगोली कडील एकूण ७८ अपहारीत प्रकरणांमध्ये रु.१५१४११२३/- रक्कम गुंतलेली आहे. त्यापैकी ४६ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत. अपहारीत रक्कमेपैकी रु.८११६३९५/- एवढी रक्कम वसूल झाली आहे.

(२) उर्वरीत ३२ प्रकरणामधील १२ प्रकरणे ही न्यायप्रविष्ठ स्वरुपाची असून रु.५९५८५३५/-, विभागीय चौकशी प्रकरणात रु.७१६१७६/- व अशासकीय व्यक्तींकडून रु.३५००१७/- असे एकूण रु.७०२४७२८/- वसूल करणे बाकी आहे. प्रलंबित अपहाराची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील धामणशेत ग्रामपंचायती अंतर्गत आदिवासी मजूरांना ठरवून दिलेल्या किमान मजूरीपेक्षा कमी मजूरी देण्यात आल्याबाबत**

**(२) १८०९८ (१६-०८-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील धामणशेत ग्रामपंचायती अंतर्गत २०८ आदिवासी मजूरांनी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) कामावर केले असता १३५ मजूरांना ठरवून दिलेल्या किमान मजूरीपेक्षा कमी मजूरी देण्यात आलेली आहे, तसेच उधळे, हट्टीपाडा, आडोशे, बारोशी व धामणशेत या ग्रामपंचयात हद्दीतील ५०० पेक्षा जास्त मजूरांनी कामाची मागणी करुन त्यांना काम न मिळाल्याने त्यांना बेकार भत्ता (बुडीत मजूरी) मिळण्यासह अन्य मागण्यांसाठी मजूरांना दिनांक २७ मे, २०१५ रोजी तहसिलदार कार्यालयावर मोर्चा काढला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १३५ मजूरांना ठरवून दिलेल्या किमान मजूरीपेक्षा कमी मजूरी देण्याची तसेच ५०० हून अधिक मजूरांनी कामाची मागणी करुन सुध्दा त्यांना काम न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०९-२०१७) :**(१) धामणशेत ग्रामपंचायती अंतर्गत रस्त्याचे कामावर मजूरांनी केलेल्या कामानुसार मोजमाप पुस्तिकेप्रमाणे मजूरी अदा करण्यात आली आहे. २०८ मजूरांपैकी १३५ मजूरांना रु. १६५ पेक्षा कमी मजूरी मोजमाप पुस्तिकेनुसार अदा झालेली आहे. माहे जानेवारीमध्ये काम मागणी केल्यानंतर १७३ मजूरांना काम न दिल्याने त्यांनी दिनांक २६.०५.२०१५ रोजी आदिवासी मजूरांचा बेकारभत्ता व अन्य मागण्यांसाठी तहसील कार्यालयावर मोर्चा काढला होता.

(२) १३५ मजूरांनी मोजमापानुसार काम केल्याने त्यांना मोजमापानुसार मजूरी अदा करण्यात आली आहे. ज्या मजूरांनी कामाची मागणी करुनही त्यांना काम देण्यात आले नाही. अशा मजूरांना नमुना क्र. १ मध्ये अर्ज देण्याबाबत व नमुना क्र. ५ ची पोहोच सादर करण्याबाबत तहसीलदार मोखाडा यांनी श्रमजीवी संघटनेस दि. ०१.०६.२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे. तथापि त्यांचेकडून सदर कागदपत्रे प्राप्त न झाल्यामुळे त्यांना बेकारभत्ता देण्याची प्रक्रिया करण्यात आली नाही. त्याचेकडून सदरची कागदपत्रे प्राप्त होण्यास विलंब होत असल्याने अजून बेकारभत्ता दिलेला नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील अपंगाच्या तीन योजना बंद करुन त्यांचा निधी झेरॉक्स मशीन योजनेस दिल्याबाबत

**(३) २२१३१ (३०-०७-२०१५). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील अपंगाच्या तीन योजना बंद करुन त्यांचा निधी झेरॉक्स मशीन योजनेस देऊनही उक्त योजना ऐनवेळेस शासनाने स्थगित केल्याने अपंग लाभार्थीचे नुकसान झाल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चांगल्या योजना बंद कराव्या लागल्याने गेल्या वर्षी जवळपास २ कोटीचा निधी अखर्चित ठेवण्याची वेळ जिल्हापरिषदेवर आली असून सदर तीन योजना बंद केल्यामुळे त्या योजनांपासून अपंगांना वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३) होय,

झेरॉक्स मशीन योजनेस तांत्रिक मान्यता प्राप्त न झाल्याने योजना राबविण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील दुधगंगा प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) २३२१० (१४-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील दुधगंगा प्रकल्पास मंजुरी मिळून ५० वर्षे लोटली तरी अद्यापही प्रकल्प अपुर्ण असून दिवसेंदिवस प्रकल्पाच्या खर्चात वाढ होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डाव्या व उजव्या या दोन्ही कालव्याचे काम प्रत्येक ५० टक्केहून अधिक अपुर्ण असून मुळचा २६.२५ कोटी रुपयांचा प्रकल्प खर्च आता १७१२.८० कोटी रुपयांवर पोहचला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ७५ टक्के काम पूर्ण असणाऱ्या प्रकल्पानांच निधी देण्याच्या धोरणामुळे निधी उपलब्ध होवू शकला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०९-२०१७) :**(१) होय.

(२) दुधगंगा प्रकल्पास शासन पत्र क्र. दिनांक २७/९/१९६५ अन्वये रु. १६.२५ कोटी रकमेस मूळ प्र.मा. देण्यात आलेली होती. शासन निर्णय दि.१५.७.२०११ अन्वये रु.१७१२.८० कोटी रकमेस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे दुधगंगा प्रकल्पाच्या डाव्या व उजव्या कालव्यांचे काम (मुख्य व शाखा कालव्यांसह) भौतिकदृष्ट्या अनुक्रमे ६०% व ९०% पूर्ण आहे.

(३) सन २०१५-१६ करीता प्रकल्पास रु.१८.०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. (प्रकल्पावर अद्यावत मान्यता प्राप्त किंमतीच्या ४७.३८% खर्च झालेला आहे.)

(४) आर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपालांचे निदेश यानुसार उपलब्ध होणाऱ्या निधीतुन प्रकल्प पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषद यवतमाळ येथे समाज कल्याण विभागामार्फत सिंचनाचे पाईप व इतर आवश्यक साहित्य लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले नसल्याबाबत**

**(५) २३४५६ (१५-०८-२०१५). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद यवतमाळ येथे समाज कल्याण विभागामार्फत सिंचनाचे पाईप व इतर आवश्यक साहित्य खरेदी करण्यात आल्याचे दिनांक ३ जून, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती किंमतीचे पाईप व इतर साहित्य खरेदी करण्यात आले करतांना इ-निविदेचा वापर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, खरेदी केलेले साहित्य अद्यापही पंचायत समितीद्वारे लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर साहित्य केव्हा वाटप करण्यात येईल,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१४-१५ या वर्षात २०% सेस व १३ वने निधीमधून एकूण रु.४,११,३७,०२२/- एवढ्या किमतीचे पाईप व इतर साहित्य खरेदी करण्यात आले होते. सदर खरेदी करण्याकरीता शासनाचे दरकरार उपलब्ध असल्याने दरकरारानुसार खरेदी करण्यात आली.

(३) हे खरे नाही.

(४) सन २०१४-१५ मधील सर्व साहित्य पंचायत समिती स्तरावरुन वाटप करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कोवाड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील ताम्रपर्णी नदीचा घाट आणि परिसराची झालेली दुरवस्था**

**(६) २५५४६ (१७-०९-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोवाड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील ताम्रपर्णी नदीचा घाट आणि परिसराची दुरवस्था झाल्याबाबत चंदगडचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक १५ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०९-२०१७) :**(१) नाही.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांना दि.१५ जून, २०१५ रोजी दिलेल्या निवेदनाची प्रत प्राप्त झालेली नाही.

तथापि, मौजे कोवाड ता.चंदगड येथे २०१४-१५ मध्ये ऑक्टोबर महिन्यात ताम्रपर्णी नदीचे डाव्या तीरावर पुलाचे खालील बाजूस नदीघाटाचे बांधकाम ग्रामपंचायत कोवाड कडून पूर्ण करण्यात आले आहे. सदर घाटाचा वापर कोवाड येथील नागरिकांकडून नियमित करण्यात येतो. नदीघाटाची स्वच्छता आठवड्यातून एकवेळ गुरुवार बाजाराचा दिवस झाल्यानंतर केली जाते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनेक जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनाची कामे सुरु करण्याबाबत**

**(७) ३७९७१ (२०-०१-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात पडलेल्या दुष्काळामुळे मराठवाड्यातील सर्वच जिल्हयांतील मजुर रोजगार/मजुरी मिळण्याच्या दृष्टीने शहराकडे वळत चाललेला आहे, मराठवाड्यात सुरु असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कामांवर मजुरांच्या संख्येत वाढ होत आहे. परंतु बऱ्याच जिल्हयात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनाची कामे सुरु नसल्याने जिल्हयातील मजुर शहरांकडे वळत असल्याची बाब माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-१०-२०१७)** :(१) मनरेगा योजनेची कामे मराठवाड्यातील बऱ्याच जिल्हयात सुरु नसल्याने मजूर शहराकडे वळत असल्याची बाब खरी नाही.
(२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही मजुरांच्या काम मागणीवर आधारीत आहे. मराठवाड्यात मजूरांनी कामाची मागणी केल्याप्रमाणे कामे उपलब्ध करून देण्यात येतात.त्यासाठी मोठया प्रमाणात कामे सेल्फवर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच जास्तीत जास्त लोकांनी कामाची मागणी करण्यासाठी तसेच त्यांच्यामध्ये जाणीव जागृती करण्यासाठी "कामावर या अभियान", "एक दिवस मजूरांसोबत" इ. उपक्रम राबवले जातात. त्याचप्रमाणे प्रसार प्रसिद्धीही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दहेगांव (ता.जिंतुर, जि.परभणी) येथील अंतर्गत रस्त्यांच्या कामाच्या हजेरीपत्रकामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(८) ३८२७९ (२०-०१-२०१६). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत दहेगांव (ता.जिंतुर, जि.परभणी) येथील अंतर्गत रस्त्यांच्या कामाचे हजेरीपत्रक काढण्यास बंदी असतांना, शासनाच्या पासवर्डची चोरी करुन ९ कामांचे परस्पर हजेरीपत्रक काढण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हजेरीपत्रक काढण्यासाठी तहसिलदारांची परवानगी घ्यावी लागते. परंतु ए.पी.ओ. यांनी शासनाच्या पासवर्डची चोरी करुन, परस्पर हजेरीपत्रक काढले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणांची चौकशी करुन शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-१०-२०१७)** :(१) व (२) हे खरे आहे.
(३) दहेगांव, ता.जिंतूर येथील अंतर्गत रस्त्याच्या कामाचे व त्यासोबत इतर ८ कामांचे हजेरीपत्रक काढण्यात आले होते. सदर बाब निदर्शनास आल्यानंतर संबंधित यंत्रणेमार्फत सदर हजेरीपत्रके संगणकीय प्रणालीवरून काढण्यात आली त्यामुळे सदर प्रकरणी शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. संबंधीत दोषी ए.पी.ओ.यांना कामावरून कमी करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हा परिषदेंतर्गत शाखा अभियंतांची अनेक पदे रिक्त असल्याबाबत**

**(९) ३८६७६ (२०-०१-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हा परिषदेंतर्गत शाखा अभियंतांची अनेक पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे विकास कामे होण्यास विलंब होत असून कार्यरत असणाऱ्या शाखा अभियंता यांचेवर कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-०९-२०१७)** :(१), (२) व (३) जिल्हा परिषद, रत्नागिरी अंतर्गत शाखा अभियंत्यांची एकूण १२९ पदे मंजूर असून त्यापैकी १०६ पदे भरण्यात आली आहेत. उर्वरित २३ पदे रिक्त आहेत.

रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त कार्यभार इतर अभियंत्यांकडे देऊन कामकाज सुरु ठेवण्यात आले आहे.

तसेच स्थापत्य अभियांत्रिकी संवर्गातून पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**गंगाखेड (जि.परभणी) तालुक्यात रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावण्याच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(१०) ३९५७९ (२१-०१-२०१६). श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गंगाखेड (जि.परभणी) तालुक्यात रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावणे या कामाकरीता लागवड अधिकारी सामाजिक वनीकरण व तहसीलदार यांनी संगनमताने म.ग्रा.रो.योजना क्र. १, २ अंतर्गत ४४ कामे मंजुर करून घेतली असल्याने या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी स्थानीक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गंगाखेड हा दुष्काळी व डोंगराळ भाग असुनही व सध्या मराठवाडयात कोठेही पाऊस नसतानाही लागवड केल्याचे दर्शविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ४४ रस्त्यांच्या दुतर्फा झाडे दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ ते दिनांक ७ ऑक्टोबर, २०१५ दरम्यान लागवड केल्याचे दर्शविण्यात आले यात तहसीलदार गंगाखेड व लागवड अधिकारी सामाजिक वनीकरण यांनी संगनमत करून गैरव्यवहार केल्याची तक्रार स्थानीक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांच्याकडे करून सुध्दा कार्यवाहीबाबत दुर्लक्ष होत असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. जयकुमार रावल (०४-१०-२०१७)** :(१) होय, लागवड अधिकारी सामाजिक वनीकरण परिक्षेत्र गंगाखेड यांनी मग्रारोहयो अंतर्गत गंगाखेड तालुक्यात तक्रारीत नमुद रस्त्याच्या दुतर्फाच्या ४४ नसुन एकुण ४३ कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता दिली व तहसीलदार गंगाखेड यांनी ४३ कामांना प्रशासकीय मंजुरी दिली आहे.

(२) हे खरे नाही. पाऊस पडल्यानंतरच रस्त्याच्या दुतर्फा मंजुर प्राप्त कामावर वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे.

(३) तहसिलदार गंगाखेड यांनी मंजूर केलेल्या ४३ रस्ते दुतर्फा वृक्ष लागवड कामांपैकी फक्त २७ रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवडीचे कामे ३० सप्टेंबर, २०१५ पुर्वी पुर्ण करण्यात आली.

त्यापैकी डोंगरगाव ते जवळा फाटा ह्या रस्त्याच्या दुतर्फा लागवड ३० सप्टेंबर, २०१५ पुर्वी वृक्ष लागवड पुर्ण झालेली होती. परंतु तांत्रिक अडचणीमुळे ई-मस्टर त्या कालावधीत निघाले नसल्यामुळे ०१ ऑक्टोबर ते ०७ ऑक्टोबर मध्ये दर्शविले आहे. यांत तहसिलदार गंगाखेड व लागवड अधिकारी सामाजिक वनीकरण परिक्षेत्र गंगाखेड यांनी संगनमत करुन गैरव्यवहार केल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर तक्रार निवारण प्राधिकारी यांच्या मार्फत तात्काळ चौकशी कारण्यात आली. त्यानुसार तहसिलदार गंगाखेड, तत्कालीन लागवड अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग, गंगाखेड व लागवड अधिकारी, गंगाखेड याचे विरुध्द प्रत्येकी रु.१०००/-ची दंडात्मक कार्यवाही करण्यात आली.

तसेच मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचे आदेश दि. २७ जानेवारी, २०१६ अन्वये तहसिलदार गंगाखेड यांना निलंबित करण्यात आले आहे.

तसेच तत्कालीन लागवड अधिकारी सामाजिक वनीकरण परिक्षेत्र गंगाखेड व लागवड अधिकारी, गंगाखेड यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

---

## बुलढाणा जिल्हयातील इंदिरा आवास योजनेच्या प्रस्तावास मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(११) ४२०४० (३०-०४-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील इंदिरा आवास योजना सन २०१४-१५ मधील उदिष्ट पुर्ण करण्यासाठी रु.१४८६.२३ लाखच्या प्रस्तावास मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांना मा.लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी पत्राद्वारे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पत्रावर निर्णय घेऊन सदर प्रस्तावास मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०९-२०१७) :**(१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सावळे-हेदवली (ता.कर्जत, जि.रायगड) या मुख्य रस्त्याची झालेली दुरवस्था

**(१२) ४४६४० (२९-०४-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावळे-हेदवली (ता.कर्जत, जि.रायगड) या मुख्य रस्त्याची दुरवस्था झाल्याने नागरीकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक जनतेने तसेच लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग (रायगड) यांच्याकडे तसेच मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे अनेकवेळा तक्रारी करुनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रस्ता डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०९-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) कर्जत तालुक्यातील राज्य मार्ग क्र.७९ या मार्गाला जोडणारा ग्रामीण मार्ग क्र.५९ सावळे गाव ते सावळे हेदवली मार्ग या नावाने ओळखला जातो. सदर रस्त्याची एकूण लांबी ५/२०० कि.मी. आहे. या मार्गावर १/५०० कि.मी. मध्ये सावळे गाव असून हेदवली गाव ३/५०० कि.मी. अंतरावर आहे.

प्रश्नांकित रस्त्याच्या ०/०० ते ३/५०० कि.मी. लांबीपैकी २/०० ते ३/१५० कि.मी. लांबीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत काम करण्यात आले असून सदर रस्ता सुस्थितीत आहे.

उर्वरीत लांबीतील रस्ता दुरुस्तीच्या कामाचा प्रस्ताव जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### गडचिरोली जिल्ह्यातील अंगणवाडी पर्यवेक्षिका पदाच्या भरतीप्रक्रियेत झालेला गैरकारभार

**(१३) ४४६८९ (३०-०४-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील अंगणवाडी पर्यवेक्षिका पदाच्या भरतीप्रक्रियेत महिला उमेदवारांना देण्यात आलेल्या दुय्यम प्रतीतील व प्रत्यक्ष जिल्हा परिषदेने जाहिर केलेल्या गुणांमध्ये तफावत आढळून आली असून याप्रकरणी गैरकारभार झाल्याबाबतच्या तक्रारी अंगणवाडी सेविकांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२७-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.
अशा प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील अंबाबाई मंदिराच्या परिसरात पर्यटकांकरिता सोयी-सुविधा उपलब्ध करण्याबाबत**

**(१४) ४६३२७ (२०-०५-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील पर्यटनामध्ये वाढ होत असूनही पर्यटकांना वाहन पार्किंग, मार्गदर्शक फलक नसल्याने पर्यटकांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही तसेच इतर सोयी सुविधा मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच शहरात मध्यवर्ती ठिकाणी अंबाबाईचे मंदिर असून या परिसरात पर्यटन माहिती केंद्र सुरु करण्याबाबत तसेच पर्यटकांकरिता सोयी-सुविधा उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१७) :**(१), (२) व (३) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये २२ वर्दळीच्या ठिकाणी फलक, कोल्हापूर महानगरपालिका हद्दीत ३३१ महितीफलक तसेच शहरांतर्गत विविध ठिकाणी वाहतूकीच्या विनियमनाचे फलक बसविण्यात आले आहेत. जिल्ह्यातील पर्यटन / धार्मिक / ऐतिहासिक स्थळांसाठी ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजना-विशेष निधी, प्रादेशिक पर्यटन विकास योजना, सामाजिक न्याय विभाग इत्यादीमार्फत निधी उपलब्ध झाला आहे. जिल्हा नियोजन समितीअंतर्गत पर्यटनासाठी सन २०१६-२०१७ मध्ये रु.४ कोटी व इको टुरिझमसाठी रु.२.५० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. पन्हाळा येथे लाईट अँड साऊंड शो उभारण्याकरिता व वन विभागामार्फत इको-टुरिझमअंतर्गत साहसी पर्यटनासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी प्रयत्न केले जात असून त्यामुळे रोजगार निर्मिती व उत्पन्न वाढीस हातभार लावणे शक्य होणार आहे.

---

**ग्रुप ग्रामपंचायत आखवणे-भोम (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) ग्रामपंचायतीच्या निधीचा अपहार झाल्याबाबत**

**(१५) ४८१६८ (२५-०४-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रुप ग्रामपंचायत आखवणे-भोम (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) ग्रामपंचायतीच्या सन २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षात ग्रामपंचायत निधीचा अपहार झाल्याचे प्रकरण ग्रामस्थांनी दिनांक २६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास ग्रुप ग्रामपंचायतीच्या झालेल्या सभेत निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामस्थांनी सभेत याप्रकरणी दोषी असलेल्यावर फौजदारी गुन्हे नोंदवून कारवाई करावी अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०९-२०१७) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे.

(३) व (४) पंचायत समिती, वैभववाडी यांच्याकडून दिनांक ०९.१०.२०१५ व दिनांक २१.११.२०१५ च्या पत्राने सहायक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षा सिंधुदूर्ग यांना कळविण्यात आल्यानुसार स्थानिक निधी लेखा परिक्षणामार्फत लेखा परिक्षण अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यानुषंगाने संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत उपनिरिक्षक, पोलिस ठाणे, वैभववाडी यांना दि.१५.१२.२०१५ रोजी कळविण्यात आले. त्यास अनुसरुन वैभववाडी, पोलिस ठाणे यांचेकडून दि.९.१.२०१६ च्या पत्रान्वये संबंधितांनी किती रकमेचा अपहार केला आहे त्याप्रमाणे अपहार करणाऱ्याविरुध्द गुन्हा नोंद करण्याबाबत कळविले. लेखा परिक्षण अहवालातील सरपंच / ग्रामसेवक यांचा चुकीचा कालावधी नमूद असल्याचे निष्पन्न झाल्याने त्याची दुरुस्ती लेखापरिक्षण अहवालामध्ये करवून घेऊन सदर दुरुस्ती दि.२.८.२०१६ रोजी प्राप्त झाली. त्यानुसार तत्कालीन उपसरपंच श्री.शांतीनाथ मानाजी गुरव व तत्कालीन सरपंच श्रीमती स्मिता संतोष नागप व तत्कालीन ग्रामसेवक श्री.जे.एन.सावंत व श्री.के.एस.चव्हाण यांचेविरुध्द पोलीस स्टेशन, वैभववाडी येथे दिनांक २२.९.२०१६ रोजी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस उपनिरिक्षक, पोलीस स्टेशन, वैभववाडी यांचेमार्फत सुरु आहे.

तसेच तत्कालीन ग्रामसेवक श्री.जे.एन.सावंत यांना दि.७.६.२०१३ रोजी निलंबित करण्यात आले आहे व उपसरपंच श्री.शांतीनाथ मानाजी गुरव यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिलेला आहे.

---

### कोपरगांव (जि.अहमदनगर) शहरासाठी निळवंडे धरणातून पिण्याचे पाणीपुरवठा करणेबाबत

**(१६) ५०६०६ (०३-०५-२०१६). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी करिता निळवंडे धरणातून येणारी पाईपलाईन पुढे कोपरगांव (जि.अहमदनगर) शहरापर्यंत वाढविणार आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजे निळवंडे (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील धरणाचे काम पूर्ण होण्याच्या मार्गावर असून कालव्यांची कामे मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याने सिंचन क्षमता पूर्ण क्षमतेने होणार नसल्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धरणाची व धरणावर असलेल्या कालव्यांची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, तदनुसार सदर धरणातून पूर्णक्षमतेने सिंचन व्हावे म्हणून कालव्यांची कामे तातडीने पूर्ण करणेबाबत व कोपरगांव शहराला पाणी पुरवठा करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०९-२०१७) :**(१) शिर्डी संस्थान पिंपळवाडी, कनकुरीसाठी वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सल्लागारामार्फत सर्वेक्षण व अंदाजपत्रकाचे काम तयार करण्यात आले असून शिर्डीकरीता निळवंडे धरणातून येणारी पाईपलाईन पुढे कोपरगांव शहरापर्यंत वाढविण्याबाबतचा प्रस्ताव प्राथमिक स्तरावर आहे.
(२) निळवंडे धरणाचे काम पूर्ण झालेले असून निधी उपलब्धतेनुसार कालव्याची कामे प्रगतीपथावर आहेत. आर्थिकदृष्ट्या उजव्या कालव्यांची कामे १० टक्के व डावा कालव्याची कामे २९ टक्के पूर्ण झालेली आहेत. सदर कालव्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर सिंचन क्षमता पूर्ण क्षमतेने होणार आहे.
(३) होय. निधी उपलब्धतेनुसार कालव्यांची कामे प्रगतीत आहेत.
(४) निधीच्या उपलब्धतेनुसार कालव्याची कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वर्धा जिल्ह्यातील डोंगरगाव पुनर्वसन लाभार्थ्यांना विशेष व्यवस्था करुन घरकुलाचा लाभ देण्याबाबत

**(१७) ५३०७० (२८-०४-२०१६). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील डोंगरगाव पुनर्वसन लाभार्थ्यांना विशेष व्यवस्था करुन घरकुलाचा लाभ देण्याबाबत स्थानक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती डोंगरगाव पुनर्वसन लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०९-२०१७) :**(१) होय.
(२) होय.
(३) इंदिरा आवास योजनेंतर्गत पंचायत समिती ग्रामपंचायत डोंगरगाव (पुनर्वसन) ता.समुद्रपूर येथील ९३ लाभार्थी घरकुलासाठी पात्र होते. त्यापैकी ०४ लाभार्थ्यांना सन २०१५-१६ मध्ये घरकुलाचा लाभ देण्यात आला आहे.

सन २०१६-१७ पासून केंद्र शासनाने इंदिरा आवास योजनेचे रुपांतर प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मध्ये केलेले आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार या योजनेसाठी लाभार्थ्यांची निवड ही सामाजिक, आर्थिक व जातनिहाय सर्वेक्षण-२०११ (SECC २०११) च्या माहितीच्या आधारे करण्यात येत आहे. त्यानुषंगाने राज्य शासनाने दि. १ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या पत्रान्वये सविस्तर सूचना दिल्या आहेत.

केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या Generated Priority List मध्ये समावेश नसलेल्या परंतू घरकुलांसाठी पात्र असलेल्या उर्वरित ८९ लाभार्थ्यांचा समावेश प्रपत्र-ड मध्ये करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नडगाव (ता.कल्याण, जि.ठाणे) ग्रामपंचायतीमध्ये झालेला आर्थिक गैरव्यवहार

**(१८) ५४२०० (२४-०८-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नडगाव (ता.कल्याण, जि.ठाणे) ग्रामपंचायतीमधील तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक यांनी सन २०१३-१४ व २०१४-१५ या कालावधीत खोट्या घर पट्ट्याच्या पावत्या बनवून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याने त्यांच्यावर कारवाई करणेबाबत गटविकास अधिकारी, कल्याण यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी, ठाणे यांच्याकडे प्रस्ताव पाठवूनसुद्धा कोणत्याही प्रकारची कारवाई केली नसल्याचे निदशर्नास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तदनुसार खोट्या घर पट्ट्याच्या पावत्या बनवून आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) शासनाने चौकशी केली आहे.

सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या कालावधीत तत्कालीन सरपंच ग्रामसेवक यांनी घरपट्ट्यांच्या खोट्या पावत्या बनवून आर्थिक गैरव्यवहार केलेला नसून, ग्रामपंचायतीचे तत्कालीन कर्मचारी श्री.रमेश नामदेव भोईर यांनी स्वत:च्या स्वाक्षरीने घरपट्टीची बीले बजावली असून, बिलांवर खोटे घर नंबर नमूद केलेले आहे. याबाबत ग्रामपंचायत कार्यालयात कोणत्याही

प्रकारच्या नोंदी नमुना नं. ८ व नमुना नं. ९ वर दप्तरी दिसून आलेल्या नाहीत. तसेच कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार झालेला दिसून येत नाही. त्यामुळे सदर प्रकरणी अफरातफर झालेली नसून संबंधित कर्मचारी यांनी ग्रामपंचायत कारभारात अनियमितता केल्याचे आढळून आले आहे.

श्री.रमेश नामदेव भोईर, ग्रामपंचायत कर्मचारी यांनी केलेल्या अनियमिततेबाबत ग्रामपंचायत नडगांव यांनी त्यांचे कडील दिनांक १०/०८/२०१५ च्या आदेशान्वये श्री.रमेश नामदेव भोईर यांना निलंबित केले आहे.

---

**हिंगोली जिल्ह्यात जिल्हा परिषदेत वर्ग १ व २ ची सुमारे १७५ पदे रिक्त असल्याबाबत**

**(१९) ५६३२४ (२३-०८-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात जिल्हा परिषदेत वर्ग १ व २ ची सुमारे १७५ पदे रिक्त आहेत याशिवाय शासनाच्या विविध विभागातील एकूण रिक्त जागा साडेपाचशेच्या पुढे असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली जिल्हा परिषदेतील रिक्त पदांचा आढावा घेऊन सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०९-२०१७) :**(१) नाही.

मे, २०१६ मध्ये हिंगोली जिल्हा परिषदेमधील महाराष्ट्र विकास सेवेतील वर्ग-१ व महाराष्ट्र विकास सेवा वगळून जिल्हा परिषदेतील इतर वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे अशी एकूण ६४ पदे रिक्त होती.

(२), (३) मे, २०१६ मध्ये हिंगोली जिल्हा परिषदेमधील महाराष्ट्र विकास सेवेतील वर्ग-१ मधील गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगोली, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औंढा-नागनाथ ही तीन रिक्त असलेली पदे दि.०९-०८-२०१६ व दि.२५-१०-२०१६ च्या आदेशान्वये भरण्यात आली आहेत. जिल्हा परिषद हिंगोली यांस रिक्त पदे तात्काळ भरणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

महाराष्ट्र विकास सेवा वर्ग-२ मधील कोणतेही पद रिक्त नव्हते.

महाराष्ट्र विकास सेवा वगळून जिल्हा परिषदेतील इतर वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे संबंधित प्रशासकीय विभागामार्फत निर्माण करण्यात आली सदर रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत संबंधित प्रशासकीय विभागांनी कार्यवाही करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

---

**काष्टी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) ग्रामपंचायतीने नगर दौंड रस्त्यावर जिल्हा परिषदेच्या जागेवर अतिक्रमण केल्याबाबत**

**(२०) ५६६२३ (११-०८-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काष्टी (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) ग्रामपंचायतीने नगर दौंड रस्त्यावर जिल्हा परिषदेच्या जागेवर अतिक्रमण करुन व्यापारी गाळे बांधले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार जिल्हा परिषदेच्या जागेवर अतिक्रमण करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०९-२०१७) :**(१) नाही, हे खरे नाही.

काष्टी, ता.श्रीगोंदा येथे ग्रामपंचायतीने नगर दौंड रस्त्यावर बांधलेले गाळे हे ग्रामपंचायतीच्या जागेवरच बांधलेले असून, सदरची जागा ही जिल्हा परिषदेच्या मालकीची नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे बेलवळे बुद्रुक (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथे इंदिरा आवास योजनेतून मंजूर झालेल्या बांधकामास परवाना मिळण्याबाबत**

**(२१) ५६७६३ (२३-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बेलवडे बुद्रुक (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथील कुटुंबास इंदिरा आवास योजनेतून घर मंजूर झाले असता ग्रामपंचायतीने घरकामास परवाना दिला नसल्याने सदर कुटुंबाने आत्मदहन करण्याचा इशारा ग्रामपंचायतीस माहे मे, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार इंदिरा आवास योजनेत मंजूर झालेले घराचे काम पूर्ण करण्यास परवाना देणेबाबत व इंदिरा आवास योजनेंतर्गत घरास निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०९-२०१७) :**(१) होय.

(२) होय.

लाभार्थ्यांने घरकुलाचे बांधकाम जिल्हा परिषद मालकीच्या रस्त्यावर अतिक्रमण करुन केल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) लाभार्थ्यांने घरकुलाचे बांधकाम जिल्हा परिषदेच्या मालकीच्या रस्त्यावर अतिक्रमण करुन केला असल्यामुळे मंजूर झालेले घरकुल रद्द करण्यात आले आहे. तसेच, लाभार्थ्यांला देण्यात आलेला घरकुलाचा पहिला हप्ता वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**मौजे तळेगाव दिघे (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथील उपसरंपचाने शाळेच्या जागेत अतिक्रमण करुन बांधकाम केल्याबाबत**

**(२२) ५६८९९ (०१-०९-२०१६). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तळेगाव दिघे (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथील उपसरंपचाने शाळेच्या जागेत अतिक्रमण करुन बांधकाम केल्याचे माहे एप्रिल, २०१६ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, तद्नुसार सदर उपसरंपचाने अतिक्रमित केलेले बांधकाम तोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०९-२०१७) :**(१) नाही, हे खरे नाही.

(२) मौजे तळेगाव दिघे (ता.संगमनेर, जि.अहमदनगर) येथील शाळेच्या जागेत उपसरपंचाने अतिक्रमण केलेले नसून, त्यांची बहीण श्रीमती मंगल दत्तात्रय शिंदे यांनी अतिक्रमण केल्याचे दिसून आले आहे.

(३) अतिक्रमण निष्काषित करणेची कार्यवाही ग्रामपंचायतीमार्फत चालू आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**मराठवाडा विभागातील ६९७९ पैकी २२६७ ग्रामपंचायतींनी रोजगार हमी योजनेंतर्गत कामावर निधी खर्च न केल्याबाबत**

**(२३) ५७२१४ (२३-०८-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागातील ६९७९ पैकी २२६७ ग्रामपंचायतींनी माहे एप्रिल, २०१५ पर्यंत रोजगार हमी योजनेंतर्गत कामांवर एकही पैसा खर्च केला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोजगार हमी योजनेंतर्गत कामावर निधी खर्च न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याप्रकरणी दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-१०-२०१७)** :(१) हे खरे नाही.

औरंगाबाद विभागात एकुण ६६४३ ग्रामपंचायतीपैकी १८९१ ग्रामपंचायतींनी रोजगार हमी योजनेअंतर्गत कामावर खर्च केला नाही.
(२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही योजना काम मागणीवर आधारीत आहे. मग्रारोहयो अंतर्गत संबंधीत ग्रामपंचायत स्तरावर मजूरांकडून कामाची मागणी नसल्याने खर्च झालेला नाही. सदर प्रकरणी गटविकास अधिकारी, ग्रामसेवक, ग्राम रोजगार सेवक यांच्या बैठका घेवून वेळोवेळी सूचना व नोटीसा दिलेल्या आहेत. तसेच सर्व ग्रामपंचायत स्तरावर मजुरांचे कॅंप घेवून मजुरांना काम मागणी करणेस प्रवृत करण्यात आले आहे. मजूरांकडून कामाची मागणी होताच कामे पुरवण्यासाठी कामांचा पुरेसा शेल्फ प्रत्येक ग्रामपंचायतस्तरावर ठेवण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाराष्ट्र रोजगार हमी योजने अंतर्गत फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यातील २३५ विहिरींना परवाना न मिळाल्याने कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२४) ५७२३३ (२३-०९-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र रोजगार हमी योजने अंतर्गत फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यातील मंजूर करण्यात आलेल्या ६३४ वैयक्तिक सिंचन विहिरींना दिलेली मान्यता जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रद्द केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व सदर सिंचन विहिरीपैकी २३५ विहिरीचे काम सुरु असताना मान्यता रद्द केल्याने विहीरींची कामे अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, २३५ विहीरींची अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०९-२०१७)** :(१) अंशत: खरे आहे.

फुलंब्री तालुक्यातील सन २०१४-१५ या वर्षात ६३४ वैयक्तिक सिंचन विहीरींना मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी ३८० वैयक्तिक सिंचन विहीरींच्या कामांच्या प्रशासकीय मान्यता दि.१३.४.२०१६ अन्वये रद्द करण्यात आल्या आहेत.

(२) एकूण ६३४ पैकी ३८० विहिरी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावरुन चौकशी अंती प्रस्ताव परिपुर्ण नसल्याने रद्द केल्या. १९ विहिरी प्रस्ताव नसल्याने पंचायत समितीस्तरावर रद्द केल्या. उर्वरित २३५ विहिरी रद्द केल्या नसल्याने त्यांची कामे सुरु ठेवण्यात आली.
(३) सदर २३५ विहिरींची कामे करण्याची कार्यवाही ग्रा.पं.मार्फत सुरु आहे. झालेल्या कामांचे मजूरांना मस्टर प्रमाणे मजूरी अदा केली जात असून कामे प्रगतीपथावर आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे करंजफेण (ता.शाहुवाडी जि.कोल्हापूर) येथील गायरान जमिनीमध्ये अतिक्रमण केल्याबाबत**

**(२५) ५८५५८ (२६-०८-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे करंजफेण (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील सात लोकांना गायरान जमिनीत घर बांधण्याची परवानगी तेथील ग्रामसेवक यांनी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परवानगी देत असताना सरपंच व बांधकाम समिती अध्यक्ष यांची परवानगी घेतलेली नाही ,सदर जमिनी गायरान मधील असून सुद्धा त्यांचा उल्लेख गावठाण मिळकत नं. ३३/०२ असा बेकायदेशीर रित्या करून घरबांधणीला परवानगी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,गायरान जमीन गट नं.१ मध्ये ग्रामस्थांनी अतिक्रमण करून घर बांधले असून सदर अतिक्रमणाची नोंद ग्रामपंचायतीने सन २०१२ मध्ये केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर अतिक्रमण हे जिल्हा परिषदेचे शिक्षक यांनी केलेले असून याबाबतीत संबंधित प्राथमिक शिक्षक व ग्रामपंचायत सदस्य यांचेकडे दिनांक २३ मे,२०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास,या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर बांधकाम परवाने रद्द करून सदर मिळकती शासन जमा करण्याबाबत व संबंधित ग्रामसेवक, प्राथमिक शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०९-२०१७) :**(१) ग्रामपंचायत असेसमेंट रजिस्टर ला मिळकत नं. ३३/०२ मध्ये ग्रामपंचायतीमार्फत बांधकाम परवानगी देताना ग्रामपंचायतीने कायदेशीर मार्गाचा अवलंब केलेला नसून त्यास तत्कालीन ग्रामसेवक दोषी दिसून येत आहेत.
(२) ग्रामपंचायत असेसमेंट रजिस्टर ला मिळकत नं. ३३/२० ला नमूद असलेल्या मिळकतीत घर बांधकामाची परवानगी श्री. केशवराव भिकाजी गुरव यांना ग्रामपंचायत मासिक सभा ठराव क्र.५/४, दि.१४/०८/२०१२ अनवये तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक यांनी दिलेली आहे. सदर मिळकत क्र.३३/०२ हा गायरान गट नं.१ मध्ये आहे. ग्रामपंचायत करंजफेण येथील गायरान

मधील जमीन नव्याने असेसमेंट नोंद करुन घरबांधकाम परवानगी दिलेली नाही. ग्रामपंचायतीने सन २०१२ मध्ये केलेली नोंद ही नवीन नोंद नसून ती १९९७-९८ पासून असेसमेंट पकी नमूद आहे.

(३) हे खरे नाही.

ग्रामपंचायत करंजफेण येथील मिळकत नं.३३/०२ ही उपलब्ध अभिलेखानुसार सन १९९७ पुर्वीपासून श्री.भिवाजी केशव गुरव यांचे नावे नोंद आहे सन २०१२ मध्ये पडसर जागा संमतीपत्राच्या आधारे ग्रा.पं. ठराव ५/४ दि.१४/०८/२०१२ ने वारंसांच्या नावे केली आहे.

(४) हे खरे आहे.

श्री.बाळासो सत्तू गुरव यांनी दि.२५/०६/२०१६ च्या पत्रान्वये श्री केशव भिकाजी गुरव यांनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण केले असल्याचे कळविले आहे.

(५) ग्रामपंचायत मिळकत क्र.३३/२ ही गायरान गट नं. १ मध्ये असून त्याची मोजणी दि.२७/०३/२०१७ रोजी झालेली असून, मोजणी नकाशा दि.०३/०५/२०१७ रोजी ग्रामपंचायतीस प्राप्त झालेला आहे. सदर नकाशानुसार १८ अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण केले आहे. अतिक्रमण धारकांचे अतिक्रमण ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीचे असल्याने जिल्हाधिकारी यांच्याकडे दि.१३/०६/२०१७ च्या पत्रान्वये अतिक्रमण निष्कासित करण्यासाठी मंजूरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून मंजूरी प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल तसेच संबंधित ग्रामसेवक यांच्यावर महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ नुसार प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वायंगती (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) गावासाठी पाणी टंचाई आराखड्यामधून तात्म्हणकरवाडीसाठी नळपाणी पुरवठा योजनेच्या दुरुस्तीबाबत**

**(२६) ६०६०५ (२३-०८-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वायंगती (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) गावासाठी पाणी टंचाई आराखड्या मधून ताम्हणकरवाडीसाठी नळपाणी पुरवठा योजनेच्या दुरुस्तीसाठी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने दिनांक २५ एप्रिल, २०१६ रोजी ५ लक्ष रुपये निधी मंजूर करुन आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करावी याबाबतचे पत्र ग्रामपंचायत वायंगणीला पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्र हे ग्रामपंचायतीला दिनांक १५ मे, २०१६ रोजी मिळाल्यानंतरही सरपंच व ग्रामसेवक यांनी नळपाणी योजनेबाबतची आवश्यकत्या कागदपत्राची पुर्तता ग्रामीण पाणी पुरवठाच्या अधिकाऱ्यांस पाठविलेली नाही म्हणून ग्रामस्थांनी सरपंच व ग्रामसेवक यांना विचारणा केली असताना कागदपत्रे घेऊन जाण्यासाठी गाडीची व्यवस्था करावी अशी मागणी केल्याबाबतची तक्रार निवेदन ग्रामस्थांनी दिनांक ६ जून, २०१६ वा त्यासुमारास सिंधुदुर्ग जिल्ह्याचे मा.पालकमंत्री तथा ग्रामविकास राज्यमंत्री यांना देऊन या प्रकरणी चौकशी करावी अशी मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रार निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) वायंगणी ग्रामपंचातीच्या वायंगणी ताम्हणकरवाडी नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामास जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी दि.१६.४.२०१६ रोजी प्रशासकीय मंजूरी दिली आहे. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग कार्यालयाच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने दि.२५.४.२०१६ च्या पत्रान्वये सरपंच, ग्रामपंचायत, वायंगणी यांनी मक्ता घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करण्याबाबत सरपंच, ग्रामपंचायत वायंगणी यांना कळविले. त्यानुसार वायंगणी ग्रामपंचायतीने मक्ता घेण्यासाठी दि.१२.५.२०१६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला. सदर कामास सरपंच, ग्रामपंचायत, वायंगणी यांना दि.२५.५.२०१६ रोजी कार्यारंभ आदेश दिला. ग्रापंचायतीला सदर कामाची ई-निविदा प्रक्रिया करणे आवश्यक असल्याने तसेच पावसाळा सुरु झाल्याने प्रत्यक्ष काम सुरु करण्यास विलंब झाला. तद्नंतर ग्रामपंचायतीच्या विनंतीच्या अनुषंगाने सदर कामास दि.३१.१२.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

दि.१२.५.२०१६ रोजी नळ पाणी पुरवठा योजनेचा मक्ता घेण्यासाठीचा प्रस्ताव वायंगणी ग्रामपंचायतीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग कार्यालयाकडे सादर केला असल्याने प्रकरणी ग्रामस्थांच्या तक्रार निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी अथवा कार्यवाही करण्यात आली नाही.

सद्यस्थितीत सदरील काम माहे मे, २०१७ अखेर पूर्ण करण्यात आले असून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बहुमजली इमारत बांधून निवासस्थान तयार करण्याची योजना राबविण्याबाबत

**(२७) ६०६३२ (२३-०८-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय धोरणानुसार इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांना घरासाठी जागा नसेल तर शासकीय जागा उपलब्ध करुन देणे क्रमप्राप्त आहे, परंतु शासकीय जागा उपलब्ध नसल्यास या कुटुंबांना जागा खरेदी करण्यासाठी ५० हजार रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यानुसार अनेक लाभार्थी कुटुंबाचे अर्ज शासनाकडे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच ५० हजार रुपयांमध्ये जागा मिळत नसल्यामुळे अनेक लाभार्थी एकत्र येवून त्यांनी बहुमजली इमारत बांधून निवासस्थान तयार करण्याची योजना शासनाने मंजूर केली आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार बहुमजली इमारत बांधून निवासस्थान तयार करण्याची योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०९-२०१७) :**(१) होय.

तथापि, केंद्र शासनाने सन २०१६-१७ पासून इंदिरा आवास योजनेच्या जागी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण ही घरकुल योजना सुरु केली आहे. या योजनेमध्ये लाभार्थी निवडीच्या निकषामध्ये झालेले बदल, केंद्राकडून प्राप्त निधीच्या प्रमाणात झालेला बदल तसेच जागा उपलब्धतेच्या निकषामध्ये झालेले बदल विचारात घेता योजनेच्या दि.३० डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयामध्ये सुधारणज्ञ करण्याची कार्यवाही चालू आहे.
(२) व (३) शासनाने दि.३० डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये पंडीत दीनदयाळ उपाध्यय जागा खरेदी अर्थसहाय योजना सुरु केली असून मोठ्या ग्रामपंचायती तसेच शहरा शेजारील ग्रामपंचायतीमध्ये जागेचे जास्त दर व जागेची कमी उपलब्धता विचारात घेता, ५०० चौ. फुटापर्यंत जागेत स्थानिक प्राधिकरणाच्या बांधकामाच्या नियमावलीनुसार दोन किंवा तीन लाभार्थ्यांच्या संमतीने दोन मजली (G+१) किंवा तीन मजली (G+२) इमारत बांधण्यासाठी प्रति लाभार्थी रु. ५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य जागा खरेदीसाठी अदा करण्याची तरतूद शासन निर्णयात केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खोलगाडगा (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील रोजगार हमी योजनेच्या कामाबाबत**

**(२८) ६२६३७ (२३-०८-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खोलगाडगा (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील गुलाबराव पुंडलीकराव वांगर व माधवराव मारोतराव हाके यांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान उपजिल्हाधिकारी यांचेकडे सन २०१० ते २०१३ या कालावधीमध्ये झालेल्या रोजगार हमी योजनेच्या कामाबाबत तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तक्रारीचे स्वरुप काय आहे व यासंदर्भात चौकशी करण्यांत आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०७-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) तक्रारीमध्ये गट क्रमांक ८० मध्ये कामे झालेली नसुन इतरत्र झाली आहेत, सदरील कामे ही अपूर्ण असून कामात गैरव्यवहार झाला आहे असे नमूद केले आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे.

(३) चौकशीमध्ये मौ.खोलगाडगा (ता.जिंतूर, जि.परभणी) या गावातील मातीनाला बांधाची कामे अंदाज पत्रात प्रस्तावित केलेल्या गट क्रमांकामध्येच झालेली आहेत. तसेच चौकशीअंती कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झाल्याचे आढळून आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्ह्याच्या तालुक्यातील आदिवासी लाभार्थ्यांना इंदिरा आवास घरकुल योजनेचा लाभ मिळण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२९) ६२७२३ (१८-०८-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्याच्या तालुक्यातील आदिवासी लाभार्थ्यांना इंदिरा आवास घरकुल योजनेचा लाभ घेण्यासाठी सुमारे ९ कोटी ५ लाखाचा निधी तात्काळ तहसिलदारांकडे सुपूर्द करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी, आदिवासी संघटना व आदिवासी लाभार्थ्यांनी दिनांक १२ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास मागणी केली असल्याने निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने प्रलंबित प्रस्तावास तातडीने मंजूरी देऊन तालुक्यातील तहसिलदारांकडे इंदिरा आवास योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०९-२०१७) :**(१) नाही.

सन २०१५-१६ या वित्तीय वर्षापासून इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या बँक / पोस्ट खात्यामध्ये थेट अनुदान जमा करण्यासाठी PFMS प्रणाली सुरु करण्यात आली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिरोली (ता.मूल, जि.चंद्रपूर) ग्रामपंचायतीच्या उपसरपंचाने विनापरवाना जागेवर व्यवसाय सुरु केल्याबाबत**

**(३०) ६२७५३ (११-०८-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिरोली (ता.मूल, जि.चंद्रपूर) ग्रामपंचायतीच्या उपसरपंचाने परवाना घेतलेल्या जागेवर विटा बनविण्याचा व्यवसाय न करता दुसऱ्याच जागेवर व्यवसाय करुन शासन निर्देशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तक्रारीनुसार चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासन निर्देशाचे उल्लंघन करणाऱ्या उपसरपंचावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

चिरोली ग्रामपंचायतीचे उपसरपंच यांनी परवाना घेतलेल्या जागेवर विटा बनविण्याचा व्यवसाय न करता दुसऱ्याच जागेवर व्यवसाय करुन शासन निर्देशाचे उल्लंघन केल्याबाबत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे दि.२२.२.२०१६ रोजी तक्रार प्राप्त झाली आहे.
(२) सदर प्रकरणाची तहसिलदार, मुल यांचेकडून चौकशी करण्यात आली असून सदर चौकशीमध्ये चिरोली ग्रामपंचायतीचे उपसरपंच श्री.अनिल माधव शेंडे दोषी आढळून आले आहेत.
(३) व (४) सदर प्रकरणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८ (७) व (८) अन्वये तहसिलदार, मुल यांनी त्यांच्या दि.३०.८.२०१६ च्या आदेशान्वये अवैध उत्खननाबाबत श्री.अनिल माधव शेंडे, उपसरपंच यांचेवर रुपये २०,४६०/- इतकी दंडात्मक कारवाई केली आहे.

तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १४ (१) (ज-१) मधील तरतूदीनुसार श्री.अनिल माधव शेंडे यांना सदस्य वदावरुन अपात्र ठरिविण्यात आले आहे. श्री.अनिल माधव शेंडे हे ग्रामपंचायत, चिरोली, ता.मुल येथे कोणत्याही पदावर नाहीत.

---

**राज्यातील ग्रामपंचायत सरपंचाच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(३१) ६३२४९ (२९-०८-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामपंचायत सरपंचाचा दरमहा केवळ १ हजार एवढे मानधन दिले जात असून सदर मानधनात वाढ करण्याची मागणी शासनाकडे करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने सरपंचाच्या मानधनात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०९-२०१७) :**(१) होय. हे खरे आहे.
(२) ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णय दि.२७ जुलै, २००९ अन्वये ग्रामपंचायतीच्या लोकसंख्या वर्गवारीनिहाय सरपंचांना प्रतिमाह रुपये ४००/६००/८०० इतके मानधन देण्यात येत होते. त्यामध्ये शासन निर्णय दि.६ सप्टेंबर, २०१४ अन्वये वाढ करुन अनुक्रमे रुपये १०००/१५००/२००० करण्यात आले आहे. सदर मानधन दि.१५ ऑगस्ट, २०१४ पासून अदा करावयाचे असल्याने याबाबत वित्त विभागाकडे वेळोवेळी अर्थसंकल्पीय अंदाज आणि पुरवणी मागणी अन्वये निधीची मागणी करण्यात येत असून त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाडा (जि.पालघर) तालुक्यातील पंचायत समिती बांधकाम व पाणीपुरवठा विभागाच्या नागरी विकास कामात झालेला गैरकारभार

**(३२) ६३६७१ (१८-०८-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यात रस्त्यांची दुरुस्तीची कामे व परिसरात पाण्याची मोठया प्रमाणावर टंचाई निर्माण झाली असून उक्त कामे गत एक ते दीड वर्षापासून नागरी सुविधांची कामे मंजूर असूनही गटविकास अधिकारी, पंचायत समिती बांधकाम व पाणी पुरवठा विभागाचे उप अभियंता, शाखा अभियंता दुर्लक्ष करीत असल्याने चौकशी करुन कारवाई करण्याबाबतच्या तक्रारी पंचायत समिती सदस्य-वाडा यांनी मा.ग्रामविकास राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक २७ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पंचायत समिती-वाडा येथील रस्त्यांच्या दुरुस्तीची, नविन रस्ते, जुन्या इमारतींचे अपूर्ण बांधकामे, नळ पाणीपुरवठा योजना या योजनांसाठी शासनाकडून निधी प्राप्त होऊनही सदर निधी दोन ते तीन वर्षापासून संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या गैरकारभारामुळे अखर्चित राहत असल्यामुळे स्थानिक नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार सदर परिसरातील नागरी विकास कामे प्रलंबित ठेवणाऱ्या गटविकास अधिकारी, पंचायत समिती बांधकाम व पाणीपुरवठा विभागातील उपअभियंता, शाखा अभियंता यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) नाही, पंचायत समिती वाडा येथील रस्त्यांची दुरुस्ती, नवीन रस्ते, तसेच इमारतीची बांधकामे या करीता शासनाकडून प्राप्त झालेला निधी अखर्चित राहून व्यपगत झालेला नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## घरकुल योजना राबविताना वस्तुस्थिती दर्शक आधारावर घरकुल वाटप करण्याबाबत

**(३३) ६३७९९ (२०-०८-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारिद्रयरेषेखालील कुटुंबाची यादी सन १९९७ नंतर दुरुस्त करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात घरकुल योजनांसाठी दारिद्रयरेषेखालील असणारे कुटुंब हा निकष लावण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात घरकुल योजना राबविताना दारिद्रय रेषा हा निकष न लावता यावे अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने वस्तुस्थिती दर्शक आधारावर घरकुल वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०९-२०१७) :**(१) सन १९९७ नंतर केंद्र शासनाच्या दि.१३.९.२००२ च्या पत्रान्वये दहाव्या पंचवार्षिक (२००२-२००७) योजनेच्या कालावधीत दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची गणना करण्यात आली आहे व तद्नंतर शासन निर्णय दि.०७ नोव्हेंबर, २००६ अन्वये सदर सर्वेक्षणांतर्गत तयार करण्यात आलेल्या याद्या केंद्र व राज्यातील विविध योजनांतर्गत लाभ देण्यासाठी वापरण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे.
(२) होय.

इंदिरा आवास योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राबवली जाते. केंद्र शासनाने इंदिरा आवास योजनेकरिता दारिद्रय रेषेची अट ठेवली होती. परंतु, सन २०१६-१७ पासून केंद्र सरकारने इंदिरा आवास योजनेचे रुपांतर प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मध्ये केले आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण करीता घरकुल पात्र लाभार्थ्यांची निवड समाजिक, आर्थिक व जातनिहाय सर्वेक्षण-२०११ (SECC २०११) च्या माहितीच्या आधारे करण्यात येत आहे.
(३) होय.
(४) सन २०१६-१७ पासून केंद्र शासनाने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण ही घरकुल योजना इंदिरा आवास योजनेच्या जागी सुरु केली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत पात्र लाभार्थ्यांची निवड सामाजिक, आर्थिक व जातनिहाय सर्वेक्षण-२०११ (SECC २०११) च्या माहितीच्या आधारे करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### चिंदर नागोची वाडी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३४) ६५०५८ (२७-०१-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिंदर नागोची वाडी (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) ह्या सुमारे दीड किलोमीटरच्या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने सदर रस्त्याची दुरुस्ती करावी असे चिंदर नागोची वाडी युवक मंडळाने मा.ग्रामविकास राज्यमंत्री यांना दिनांक ७ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवून घेण्यात यावेत असा आदेश मा. पालकमंत्री, सिंधुदुर्ग यांनी त्यांचे पत्र क्र. ९/४/२०१५/खा.स./स्वी.स./जनरल/२१५/२०१५ द्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी, सिंधुदुर्ग यांना देवूनसुध्दा अद्यापही सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवदेनानुसार रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत व रस्त्याच्या कामास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७) :**(१) होय, निवेदन प्राप्त आहे ,हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे, सद्यस्थितीत जिल्हा परिषद खात्यांतर्गत मजुराकडून तात्पुरत्या स्वरुपात जांभ्या खडीने खड्डेभरुन घेण्यात आले आहेत.
(३) चिंदर नागोचीवाडी रस्ता २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार ग्रामीण मार्ग क्र. ३१ दर्जाचा आहे.रस्त्याची एकूण लांबी १.०० कि.मी. असून प्रत्यक्षात लांबी ०.६५० कि.मी. इतकी आहे.

रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम सन २०१६-१७ अंतर्गत सदर रस्त्याचे रु.४.०० लक्षचे काम मंजूर करण्यात आले असून निधीही वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मध्य वैतरणा प्रकल्पावर जलविद्युत प्रकल्प राबविण्यासाठी महापालिकेस परवानगी देण्याबाबत

**(३५) ६५२२३ (०७-०२-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोखाडा (जि.ठाणे) तालुक्यातील शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे मध्य वैतरणा जलाशयात २५ मेगावॅट वीज निर्मिती करण्याचा निर्णय मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक ०१ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच मध्य वैतरणा प्रकल्पाचे काम मुंबई महापालिकेने उत्तमरित्या पूर्ण केले असल्याने मुंबईतील वीजेची गरज विचारात घेऊन सदरहू मध्य वैतरणा प्रकल्पावर जल विद्युत प्रकल्प राबविण्यासाठी महापालिकेने परवानगी मिळण्याबाबत लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, उक्त जलविद्युत प्रकल्पाची परवानगी महापालिकेस देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा कण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-०९-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

या प्रकल्पस्थळी जलविद्युत प्रकल्प उभारणीचा निर्णय पूर्वीच घेण्यात आला आहे.
(२) होय, खरे आहे.

(३) तत्कालीन मा.मुख्यमंत्री स्तरावर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला होता.

(अ) "सदर धरणाच्या जागेवर महानगरपालिकेने कोणत्याही खाजगीकरणाव्दारे सदर ठिकाणी वीज निर्मिती प्रकल्प न उभारता केवळ मनपाच्या अंगीकृत बेस्ट उपक्रमांव्दारे सदर वीज निर्मिती प्रकल्प करण्याच्या अटीसापेक्ष बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी." असा निर्णय फेब्रुवारी, २०१४ मध्ये निर्णय घेण्यात आला.

(ब) "मध्य वैतरणा धरणाची मालकी आणि नियंत्रण बृहन्मुंबई महानगरपालिकेची असून वन विभागाने सदर धरणाची व पायथ्याखालील जागा महानगरपालिकेला हस्तांतर केली आहे.

सबब महानगरपालिकेची मान्यता न घेता व बेस्ट उपक्रमास डावलून प्रस्तावित जलविद्युत प्रकल्प खाजगीकरणाव्दारे राबविणे उचित होणार नाही. तथापि बेस्ट उपक्रमामार्फत सदर प्रकल्प विकसित करावयास अडचण असल्यास आणि हा प्रकल्प शासनास घ्यावयाचा झाल्यास महाजनको मार्फत घेण्यात यावा." असा निर्णय ऑगस्ट,२०१४ मध्ये घेण्यात आला.

(४) या प्रकरणाच्या नस्तीवर पुनर्विलोकन होऊन निर्णय घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील दहेगांव रंगारी या ग्रामपंचायतीत रोजगार हमी योजने अंतर्गत राबविण्यात आलेल्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(३६) ६५४३९ (२७-०१-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील सावनेर तालुक्यातील महामार्गालगत दहेगांव रंगारी या ग्रामपंचायत अंतर्गत रोजगार हमी योजनेच्या कामात कर्मचाऱ्यांच्या संगनमताने गटविकास अधिकारी यांनी सन २०१५-१६ व २०१६-१७ या आर्थिक वर्षात सहाशे वृक्ष लागवड दाखवून बनावट मजुरांचे हजेरीपट तयार करून लाखो रुपयांचा अपहार केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच हजेरीपटावर दहेगांव रंगारी ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी व सरपंच यांच्या नावाच्या बनावट स्वाक्षऱ्या व शिक्का मारून गटविकास अधिकारी यांनी मजुरांचे हजेरीपट तयार केले असून खंडविकास अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने दहेगांव रंगारी या गावात पंचायतीच्या नावावर १ लाख ५२ हजार ४८६ रुपये वेगवेगळया नावाने घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१८-०९-२०१७)** :(१) व (२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशीमध्ये दहेगाव रंगारी या ग्रामपंचायतीमध्ये सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये वृक्ष लागवडीचे काम झालेले नसून सन २०१४-१५ मध्ये लावण्यात आलेल्या ६०० पैकी ५५० वृक्ष लागवडीचे संगोपन झाल्याचे दिसून येते.

तसेच प्राथमिक उपलब्ध दस्तऐवजावरुन हजेरीपत्रके ग्रामपंचायत स्तरावर हजेरी नोंदवून पंचायत समितीला सादर केल्यानुसार FTO द्वारे मजुरांचे खात्यात मजुरी रक्कम रु.१,७६,७४९/- मजुरांचे बँक खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

(४) मुळ हजेरीपत्रक उपलब्ध होत नसल्यामुळे तत्कालीन ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिमूर (जि.चंद्रपूर) तालुक्यातील चिंचाळा व मदनापूर या दोन्ही गावातील ग्रामपंचायतीत मनरेगातंर्गत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३७) ६६७१५ (२७-०१-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमूर (जि.चंद्रपूर) तालुक्यातील चिंचाळा व मदनापूर या दोन गावातील अंतर ७० ते ८० किमीचे असताना एकाच तारखेला एकाचवेळी एकाच वाहनाने या दोन्ही गावात रेती आणि मुरुम टाकल्याचे दाखवून देयके घेऊन ग्रामपंचायतीत मनरेगातंर्गत लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच वाहनाद्वारे एकाच वेळी साहित्याची वाहतूक करुन बनावट देयके तयार करुन निधीची लूट करण्यात आल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) तदनुसार गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२५-०९-२०१७)** :(१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशीमध्ये संबंधित अधिकारी/कर्मचारी दोषी असल्याचे आढळून आले आहे.

(३) सदर दोषी असलेल्या अधिका-यांपैकी तत्कालिन गटविकास अधिकारी यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच सहाय्यक लेखाधिकारी,पंचायत समिती,चिमूर यांना निलंबित करण्यात आले असून ग्राम पंचायत, मदनापूर व चिंचोळा येथील सचिव यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

तसेच अवैद्यरित्या मुरुम उत्खनन केल्याबद्दल रॉयल्टी रक्कम रु.१५,५५,२५५/- संबंधितांकडून वसुल करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्हा परिषद अंतर्गत ११ व्या वित्त आयोगांतर्गत करण्यात आलेल्या कामाची देयके कंत्राटदारांना अदा करण्याबाबत**

**(३८) ६६८६१ (०५-०१-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हा परिषद अंतर्गत ११व्या वित्त आयोगांतर्गत करण्यात आलेल्या कामांची एकूण १७ देयके अदा करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर लेखाशीर्ष अंतर्गत एकूण ८९ कामांना दिनांक २४ ऑगस्ट, २००४ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात येऊन कामे करण्यात आली त्यापैकी १७ कंत्राटदार व्यतिरिक्त सर्वांच्या कामांची देयके अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कंत्राटदारांना कामाची देयके देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१६-०९-२०१७) :**(१) होय
(२), (३) व (४) केंद्रिय वित्त आयोगाचा कालखंड हा ५ वर्षासाठी असतो. त्यानुसार ११ व्या वित्त आयोगाचा कालखंड २०००-२००५ असा होता. केंद्रिय वित्त आयोगाच्या प्राप्त होणा-या निधीतून कामांचे नियोजन करताना उपलब्ध निधीच्या मर्यादेतच कामाचे नियोजन करणे आवश्यक असते. त्यामुळे ११ व्या वित्त आयोगाच्या निधीतून जी अधिकची कामे जिल्हा परिषदेकडून करण्यात आली आहेत, ती अनुज्ञेय बाबींवर केली असल्याने त्यावर झालेला जादा खर्च जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नातून भागविण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.

कंत्राटदारांची देयके तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित असल्याने जिल्हा परिषद स्थायी समितीची मंजूरी आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेने अंदाजपत्रकात तरतूद करुन जिल्हा परिषद स्थायी समितीच्या मंजुरीकरीता प्रस्ताव सादर केला असता, विषयसूचीवर घेण्यात आला नसल्याने देयके अद्यापि प्रलंबित आहेत. प्रलंबित देयके जिल्हा परिषदेने स्वउत्पन्नातून अदा करण्याबाबत शासनाने मान्यता दिलेली आहे.त्यानुसार कामाची प्रलंबित देयके अदा करण्यासंबंधीची कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना देण्यात आल्या आहेत.

---

**खंबाळा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांनी केलेला गैरकारभार**

**(३९) ६७२१४ (२७-०१-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खंबाळा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील ग्रामपंचायतीमधील आदिवासी महिला सरंपचाला डावलून कागदोपत्री मासिक सभा घेतल्याचे दाखवून ग्रामसेवक, गटविकास अधिकारी यांनी एकूण ५ लाख रुपयांच्या ग्रामपंचायत कार्यालयाच्या सुशोभिकरणासाठी व किरवली स्मशानभूमी संरक्षक भिंत बांधण्याच्या कामासंदर्भात निविदा खुल्या करुन कामास मंजूरी दिल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात सरंपच, खंबाळा ग्रामपंचायत यांनी नियमबाह्य काम करुन गैरकारभार करणाऱ्या ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांस निलंबित करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. ठाणे यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार गैरकारभार करणाऱ्या ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०९-२०१७) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

खंबाळा ग्रामपंचायतीचे सरपंच यांच्या अनुपस्थितीत निविदा उघडणे व त्यांच्या उपस्थितीत सभा घेण्यात आली असे अनौपचारिक इतिवृत्त ग्रामसेवकाने लिहिले हे खरे आहे.

(२) होय.

सरपंच ग्रामपंचायत खंबाळा यांनी ग्रामसेवक उपसरपंच व ग्रामपंचायत कर्मचारी यांचे विरूध्द तक्रार केलेली आहे.

(३) होय. याबाबत चौकशी करण्यात आली आहे.

सदर चौकशी अहवालानुसार ग्रामपंचायत खंबाळा येथील जनसुविधा अंतर्गत कामे कार्यारंभ आदेश दिले नसल्याने त्यात गैरकारभार अथवा अनियमितता झालेली नाही. तसेच गटविकास अधिकारी पंचायत समिती भिवंडी यांचेकडील अहवालानुसार जनसुविधा अंतर्गत मंजूर कामाचा आदेश दिले नसल्याने, अनियमितता झालेली नाही. निविदा उघडण्यात आल्याच्या नोंदीबाबतच्या इतिवृत्तामध्ये सरपंच यांच्या उपस्थितीत सभा घेण्यात आली असे अनावधानाने नमूद केले असून सदरची सभा ही ग्रामपंचायतीची मासिक सभा नव्हती असा खुलासा ग्रामसेवक यांनी केला आहे. त्यामुळे ग्रामसेवक यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही. सदर प्रक्रिया ही पुर्णत: ग्रामपंचायत स्तराशी संबंधित असल्याने त्यात गटविकास अधिकारी यांचा समावेश नसल्याने गटविकास अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुक्ताईनगर (जि.जळगाव) उपसा सिंचन योजनेचे अतिवृष्टी व महापुरामुळे झालेल्या नुकसानीसाठी निधी देण्याबाबत**

**(४०) ६७६७३ (२७-०१-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर उपसा सिंचन योजना (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) या योजनेचे माहे ऑगस्ट, २००६ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टी व महापुरामुळे नुकसान झालेले असून अपु-या निधीमुळे काम पूर्ण होऊ शकले नाही म्हणून कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे महामंडळ, जळगाव यांनी शासनाकडे प्रशासकीय मंजुरी व निधीसाठी प्रस्ताव सादर केला असून त्याबाबत प्रस्तावित कामे पूर्ण करण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०९-२०१७) :**(१), (२) व (३) होय, मुक्ताईनगर उपसा सिंचन योजनेच्या प्रशासकीय मान्यतेचा प्रस्तावांसंदर्भात लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे.

तथापि, अतिवृष्टी व महापुरामुळे झालेल्या नुकसानीचे पाहणी करुन त्याअनुषंगाने मुक्ताईनगर उपसा सिंचन योजनेच्या देखभाल व दुरुस्ती कामास सन २०१२ मध्ये रु.४८.३२ लक्ष तसेच विदयुत व यांत्रिकी उपकरणांच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामास सन २०१३ मध्ये रु.६०.५४ लक्ष आणि वाढ विस्तार स्थापत्य कामास सन २०१४ मध्ये रु.२०५.३ लक्ष असे एकूण रु.३१४.१६ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्याअंतर्गत कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित दुरुस्ती कामांचा अंतर्भाव असलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर शेरे पुर्तता कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यातील डोंगरी विभागातील अंगणवाडी इमारतीसाठी शासकीय जागा उपलब्ध नसल्याबाबत**

**(४१) ६८१२१ (२७-०१-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व विभागांचा समातोल विकास व्हावा या धोरणाने शासनाने डोंगरी विभागाच्या काही विशिष्ट गरजा लक्षात घेता क्र-डोंविका २००९/प्रकरण ६/का.१४८३ दिनांक १८ जानेवारी, २०१० रोजी शासन निर्णय केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन निर्णयामध्ये अनुज्ञेय निधीमधून २५ टक्के रक्कम अंगणवाडी बांधकामासाठी उपयोगात आणण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडी बांधकामकरिता शासनाच्या जिल्हा वार्षिक योजनेमधून भरीव निधी येत असून सध्या बहुतांश गांवामध्ये अंगणवाडी इमारतीसाठी शासकीय जागा उपलब्ध नसल्याने अशा ठिकाणी इमारतींची कामे होऊ शकत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, २५ टक्के अंगणवाडी बांधकामाकरिता राखून ठेवलेला निधी इतर कामासाठी खर्च करण्यास शासन परवानगी देवून नवीन शासन निर्णय काढणार आहे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-०८-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे अंशतः खरे आहे. डोंगरी विभाग विकास कार्यक्रमाअंतर्गत एकुण २२ जिल्हे असून, त्यापैकी ९ जिल्हयांमधील काही गावांमध्ये अंगणवाडी इमारतीचे बांधकामास जागा उपलब्ध होण्यास अडचणी येत असल्यामुळे, त्या ठिकाणी अंगणवाडी इमारतीचे बांधकाम सुरु झालेले नाही.
(४) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डोंविका- २००९/प्र.क्र.६/का.१४८३, दिनांक १८ जानेवारी, २०१० रोजीच्या शासन निर्णयानूसार अंगणवाडी बांधकामाची आवश्यकता नाही किंवा तेथे तसा वाव नाही, ही बाब जिल्हास्तरावरील संबंधित विभाग प्रमुखाने प्रमाणित केल्यास यासाठीचा २५% राखीव निधी डोंगरी विभाग विकास समितीच्या सल्ल्याने इतर अनुज्ञेय कामांवर/योजनांवर खर्च करता येईल. अशी तरतुद असल्याने, नवीन शासन निर्णय काढण्याची आवश्यकता नाही.

---

**जव्हार (जि.पालघर) येथील रस्ते व साकव कामांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(४२) ६९८७९ (२७-०१-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि.पालघर) येथील जव्हार ऐना-जव्हार-मेढा, जव्हार-पाथर्डी, घीवंडा, शिवाचा पाडा, दापटी, तिलोडा, झाप आदि रस्ते व साकव दिनांक २ जुलै, २०१६ रोजी झालेल्या पावसात वाहून गेल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामांमध्ये तेथील पंचायत समिती उपअभियंता यांनी ठेकेदारांशी संगनमत करुन गैरव्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील मौजे वाघेरी, पियाळी व वायंगणी या ग्रामपंचायतीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(४३) ७०१३७ (२७-०१-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील मौजे वाघेरी, पियाळी व वायंगणी या ग्रामपंचायतीमध्ये उपप्रमाणता शिवाय तसेच खरेदीच्या पावती शिवाय मोघम खर्च करणे दरपत्रकाशिवाय साहीत्य खरेदी करणे वसूली रक्कम किर्दीत जमा न करणे दप्तरी प्रमाणक न ठेवता मोघम खर्च करणे मुल्यांकना शिवाय खर्च करणे वसुल केलेल्या रक्कमा ग्रामनिधित जमा न करणे, रोजकिर्द परीपूर्ण न लिहिणे, पर्यावरण ग्रामयोजना वसूली अपहार १३ वा वित्त आयोग मुल्यांकनाशिवाय खर्च करणे इत्यादी रक्कमेत ग्रामसेवक यांनी सन २००१ ते २०१३ या कालावधीत कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याची नोटीस उप मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी संबधित ग्रामसेवकास पाठविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी ग्रामसेवकाच्या आर्थिक व्यवहाराची तपासणी प्रत्येक महिन्याला करणे बंधनकारक असताना तपासणी न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार गैरव्यवहार करणाऱ्या ग्रामसेवकावर व प्रत्येक महिन्याला लेखाजोग्याची तपासणी न करणा-या संबधित अधिका-यावर कारवाई करण्याबाबत शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१७) :**(१) होय. हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

तत्कालीन विस्तार अधिकारी व गट विकास अधिकारी पं. स. कणकवली यांनी वाघेरी, पियाळी व वायंगणी ग्रामपंचायतीच्या तपासण्या केलेल्या असून तपासणीमध्ये आढळलेल्या अनियमिततेबाबत श्री.लक्ष्मण गणपत रसाळ, तत्कालीन ग्रामसेवक यांना वेळोवेळी समज दिलेली आहे. तथापि श्री. रसाळ यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षक ओरोस, सिंधुदुर्ग यांनी केलेल्या लेखापरिक्षणामध्ये गंभिर त्रुटी आढळून आल्या. त्याअनुषंगाने गट विकास अधिकारी पं.स. कणकवली यांचे कार्यालयाकडून तात्काळ चौकशी करून लेखापरीक्षणातील गंभीर त्रुटीस जबाबदार ग्रामसेवक श्री. लक्ष्मण गणपत रसाळ यांना वेळोवेळी नोटिसा देण्यात आल्या.

(३) व (४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्या दि.२५.११.२०१६ च्या आदेशान्वये श्री. लक्ष्मण रसाळ, तत्कालीन ग्रामसेवक (सध्या ग्राम विकास अधिकारी पं.स. कुडाळ) यांना सदर प्रकरणी निलंबित करण्यात आलेले आहे. लेखापरीक्षणातील त्रुटींबाबत श्री. लक्ष्मण गणपत रसाळ, ग्रामसेवक यांना गट विकास अधिकारी,पंचायत समती, कणकवली व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग स्तरावरून वेळोवेळी नोटिसा देण्यात

आलेल्या आहेत. ग्रामपंचायत पियाळी, ग्रामपंचायत वाघेरी व ग्रामपंचायत वायंगणी येथील सन २००१ ते २०१३ या कालावधीतील लेखापरीक्षणातील आक्षेपित परिच्छेदांपैकी ग्रामपंचायत पियाळी येथील सन २००१-०२ ते २००५-०६ या कालावधीतील लेखापरीक्षणातील आक्षेपित परिच्छेद क्र.७,९ व १७ ची पूर्तता स्विकृत करण्यात आली असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी त्यांच्या दि. १९.०५.२०१५ च्या पत्रान्वये संचालक, स्थानिक निधी लेखा, सिंधुदुर्ग यांना कळविले आहे. तसेच इतर मुद्दयांबाबत आवश्यकतेनूसार वसूलीची कार्यवाही व प्रशासकीय कार्यवाही सुरू केलेली आहे.

---

## औरंगाबाद जिल्हयातील पिंपळगाव गंगादेव येथील शेतकऱ्याला मंजूर झालेल्या विहिरीची रक्कम न मिळल्याबाबत

**(४४) ७०३३० (२७-०१-२०१७). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील पिंपळगाव गंगादेव येथील ४० वार्षिक मच्छिंद्र झाल्टे या शेतकऱ्याने मंजूर झालेल्या विहिरीची रक्कम मिळत नसल्याने व उसनवारी करुन विहिरीचे काम केल्याने कर्जबाजारीपणातून विष प्राशन करुन दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास आत्महत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार मंजूर विहिरीची रक्कम शेतकऱ्याला न देणाऱ्यावर कारवाई करण्यासह आत्महत्याग्रस्त व्यक्तीच्या कुटूबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३१-०८-२०१७)** :(१) मंजुर झालेल्या सिंचन विहिरीचे पैसे मिळत नसल्याने आत्महत्या केली हे खरे नाही.

(२) सदर प्रकरणी तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीव्दारे चौकशी करण्यात आली. चौकशी अहवालानुसार शेतक-यास मंजूर झालेल्या वैयक्तिक सिंचन विहीरींचे पैसे मृत्यु पुर्वीच देण्यात आले आहेत त्यामुळे सिंचन विहीरीचे पैसे न मिळाल्याने आत्महत्या केल्याचे निष्पन्न झालेले नाही.

(३) या प्रकरणात कोणीही दोषी असल्याचे आढळून आलेले नाही. तथापी शासनातर्फे एक लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सामदा बुज (ता.सावली, जि.चंद्रपूर) येथील कुटूंब अर्थसहाय योजनेचे बनावट दाखले बनवून केलेला गैरकारभार**

**(४५) ७०५६९ (२७-०१-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील सामदा बु येथील ग्रामपंचायतीच्या सरंपचानी ग्रामपचांयतीच्या डाटा एन्ट्री ऑपरेटरवर दबाव आणून कॉम्पूटराईज बनावट दाखले करावयास लावून त्या बनावट दाखल्याच्या आधारे कुंटूंब अर्थसहाय योजनेचे प्रस्ताव हे दिनांक २३ एप्रिल,२०१५ ते २७ फेब्रुवारी, २०१५ या कालावधीमध्ये संरपचानी स्वत:च्या अक्षरात तयार केला असा स्वयं स्पष्ट अहवाल चौकशी अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत समिती सावली यांनी दिनांक ९ मार्च,२०१६ रोजी उपमुख्य कार्यपालन अधिकारी चंद्रपूर यांच्याकडे सादर करुन सुध्दा अद्यापही कोणत्याही व्यक्तीवर कार्यवाही करण्यात आली नसल्याची माहिती दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बनावट दाखल्या संदर्भात पोलीस स्टेशन सावली येथे तहसिलदार सावली यांनी तक्रार दाखल करुन सुध्दा गेल्या सहा महिन्यापासून चौकशीच्या नावाखाली मुख्य आरोपीस अद्यापही अटक करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार बनावट कुंटूंब अर्थसहाय योजनेचे दाखले देणा-यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) होय. चौकशी करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी चौकशी अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, सावली यांनी केलेल्या चौकशीमध्ये श्री.सुधीर देविदास निकुरे, डाटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामपंचायत, सामदा बुज हे दोषी असल्याचे आढळून आले.

(४) सदर प्रकरणी दोषी असलेले श्री. सुधीर देविदास निकुरे, डाटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामपंचायत, सामदा बुज यांचे विरुध्द दि. १२ जून, २०१३ च्या शासन परिपत्रकानुसार गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सावली यांनी दि.११/०३/२०१६ च्या पत्रान्वये केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन सावली येथे दि. १२/०३/२०१६ रोजी एफआयआर क्र.०६७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणातील आरोपी श्री. सुधीर देवीदास निकुरे, रा. सामदा यांना अपराध क्र. ६७/१६ कलम ४६८, ४७१,४२० भादंविचे गुन्हयात दि.१२.७.२०१६ रोजी अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

श्री.निकुरे, डाटा एन्ट्री ऑपरेटर यांनी दिलेला दाखला तहसिल कार्यालय, सावली यांनी अवैध ठरवून लाभार्थीला अपात्र केलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील कर्मवीर कन्नमवार जलाशयाचे बुडीत क्षेत्रातील गाळ काढणेबाबत**

**(४६) ७०६९४ (२७-०१-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यामध्ये केवळ एक दोन सिंचन प्रकल्प आहेत त्यातील हे क.क. जलाशय आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, क.क. जलाशयाची सिंचन क्षमता ९९६० असून त्याचे बुडीत क्षेत्र १५४३ असून प्रकल्पाच्या या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गाळ असल्याने त्याची सिंचन क्षमता कमी झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,याबाबत कार्यकारी अभियंता चंद्रपुर पाटबंधारे विभाग यांचेशी पत्र व्यवहार केला असता वाहतूक अडचण व २३ कोटी रक्कमेच्या खर्चाचे कारण दाखवून गाळ काढण्यास नकार दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर जलाशयातील गाळ काढण्याबाबत व गाळ काढण्यास विलंब लावणाऱ्या संबंधितावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०८-२०१७) :**(१) नाही. गडचिरोली जिल्हयात दिना मोठा प्रकल्प कर्मवीर कन्नमवार जलाशय (क.क.जलाशय) व २२ लघु प्रकल्प पूर्ण झालेले आहेत.
(२) नाही. या प्रकल्पाची संकल्पित सिंचन क्षमता १२६५६ हे. असून दरवर्षी साधारणत: ११००० हे. क्षेत्रास सिंचन करण्यात येत आहे.
(३) व (४) अंशत खरे आहे.

कार्यकारी अभियंता, चंद्रपूर पाटबंधारे विभाग , चंद्रपूर यांनी अभ्यास करून गाळ काढण्याचे अंदाजपत्रक जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना सादर केले . सादर केलेल्या प्रस्तावानुसार प्रस्तावाची किंमत रू.२३.१३ कोटी असून गाळ साहित्य साठविण्यासाठी मोकळी शासकीय जागा उपलब्ध नसल्यामुळे तसेच प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रामधील बरेचसे क्षेत्र जंगलव्याप्त असल्यामुळे गाळ साहित्याची वाहतूक करणे अडचणीचे असल्यामुळे प्रस्ताव आर्थिक व तांत्रिक दृष्टया संयुक्तीक होत नाही.

तथापि, आता जलसंपदा विभागाचा शासन निर्णय क्र.मेरीना-२०१४ / प्र.क्र.( १८२/१४) लाक्षेवि (आस्था) दि.४.५.२०१७ व लाक्षेवि-२०१७/(६७/२०१७)/लाक्षेवि आस्था,दि.२४.०५.२०१७ तथा जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्र.गामुध - २०१७ / प्र.क्र.१३४/जल -१ दि. ६ मे २०१७ नुसार राज्यातील जलाशयांमधील गाळ निष्कासित करण्याचे धोरण राज्य शासनाने स्विकारले असून त्यानुसार कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पालघर (जि.पालघर) तालुक्यातील अक्करपट्टी ग्रामपंचायतीत झालेला गैरव्यवहार

**(४७) ७०८८३ (२७-०१-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर (जि.पालघर) तालुक्यातील अक्करपट्टी ग्रामपंचायतीत ३६ लाखांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. मौजे ग्रामपंचायत अक्करपट्टी, ता.पालघर येथे NPCIL च्या CSR फंडातून सन २०१३ मध्ये चार रस्त्यांच्या कामाकरिता रू. ५७,९९,४०६/- खर्च करण्यात आली असून या कामाचे मुल्यांकन रु.२४,२०,५९५/-इतक्या रक्कमेचे झाले आहे. सदर मुल्यांकनापेक्षा रु.३३,७८,८११/- ठेकेदारास जादा प्रदान करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर कामाचे मूल्यांकन शाखा अभियंता यांनी केले असून मूल्यांकन प्राप्त झाल्यावरच गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आली.

(३) या गैरव्यवहारास जबाबदार श्रीम. मीना गंगाधार पाठारे, तत्का.ग्रामसेवक यांना दि.०३.०७.२०१५ च्या आदेशान्वये सेवेतून निलंबित करून विभागीय चौकशी प्रस्तावित करणेत आली आहे व श्री.व्ही.डी. बिऱ्हाडे, शाखा अभियंता यांना दि. २७.०८.२०१५ च्या आदेशान्वये सेवेतून निलंबित करणेत आले आहे. श्रीमती हेमांगी हेमंत राऊत, तत्कालिन सरपंच, ग्रामपंचायत अक्करपट्टी यांना सरपंच पदावरुन दूर करण्यात आले असून ग्रामपंचायती मधून काढून टाकणेत आले आहे. सरपंच, ग्रामसेवक, शाखा अभियंता व ठेकेदार यांच्याविरूध्द, भारतीय दंडविधान संहिता कलम ४०८, ४०९, ४२० व ३४ अन्वये गुन्हा दाखल करणेत आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रत्नागिरी जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा क व ब वर्गात समावेश करण्याबाबत

**(४८) ७१८४८ (२७-०१-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील पर्यटन क्षेत्रांना भेटी देणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढत असल्यामुळे येथील पर्यटन स्थळांचा क व ब वर्ग पर्यटनस्थळांमध्ये समावेश करावा अशी मागणी रत्नागिरी जिल्ह्याचे मा.पालकमंत्री यांनी मा.पर्यटनमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२४-०८-२०१७) :**(१) होय.
(२) व (३) सदर मागणीबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे.

---

**आंजी (मोठी) (ता.जि.वर्धा) येथील ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसचिव यांनी केलेला गैरकारभार**

**(४९) ७२२९८ (२७-०१-२०१७). श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंजी (मोठी) (ता.जि.वर्धा) येथील ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसचिव यांनी इतर सदस्यांना विश्वासात न घेता विकास कामे व इतर कामांना परस्पर मंजूरी दिली असून सरपंच व ग्रामसचिव हे इतर सदस्यांचे फक्त हजेरी पटावर स्वाक्षऱ्या घेऊन स्वमर्जीने कार्यवृत्त लिहुन घेऊन विकास कामांची निविदा न काढता परस्पर कामे आपल्या मर्जीतील लोकांनाच वाटप करण्यात येत असल्याबाबतची लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, वर्धा यांचेकडे दिनांक २७ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार दोषी सरपंच व ग्रामसचिव यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०९-२०१७) :**(१) होय. हे खरे आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आलेली आहे. चौकशी नुसार महाराष्ट्र ग्रामपंचायत १९५९ चे नियम ४० प्रमाणे सभेला उपस्थित सर्व सदस्यांच्या कार्यवृत्तावर नियमाप्रमाणे आवश्यक असलेल्या संख्येइतपत सहया नसल्यामुळे सदर सभेतील कामकाज नियमबाहय ठरत असल्यामुळे सरपंच व सचिव यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केल्यामुळे ते कारवाईस पात्र असल्याचे दिसून आले आहे.
(३) व (४) सरपंच यांचे विरूध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम ३९(१) नुसार कार्यवाही सुरू करण्यात आलेली असून तसा प्रस्ताव जिल्हा परिषदेने विभागीय आयुक्त, नागपूर कार्यालयास दि.२१.३.२०१७ च्या पत्रान्वये सादर केला आहे. त्याची प्रथम सुनावणी दि.२८.६.२०१७ रोजी ठेवण्यात आली आहे.

तसेच जिल्हा परिषद, नागपूर यांच्या दि.३.५.२०१७ च्या आदेशान्वये श्री.ए.आर.सुरकार, ग्रामपंचायत सचिव यांचे विरूध्द सहायक आयुक्त (चौकशी) नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे विभागीय चौकशी सुरू करण्यात आली असून त्यात श्री.ए.आर.सुरकार यांचेविरूद्ध सात आरोप ठेवण्यात आले आहेत. त्याबाबतची प्रथम सुनावणी दि.२३.६.२०१७ रोजी ठेवण्यात आली आहे.

---

**निळवंडे धरणातून पाईप लाईन ने पाणीपुरवठा करण्यासंदर्भातील कामाच्या सर्वेक्षणाबाबत**

**(५०) ७२७६५ (२७-०१-२०१७). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निळवंडे धरणातून थेट शिर्डी पर्यंत व शिर्डीहून कोपरगाव पर्यंत पाईप लाईनने पाणीपुरवठा करण्यासंदर्भात शासनाने सर्वेक्षणाचे काम हाती घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे सर्वेक्षणाचे काम कधी पूर्ण होणार आहे व यास कधी मान्यता देणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-०९-२०१७) :**(१) व (२) शिर्डीकरिता निळवंडे धरणातून येणारी पाईपलाईन पुढे कोपरगाव शहरापर्यंत वाढविण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी संबंधीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.